# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
Formerly Pune University

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

| | |
|---|---|
| अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | Internal Quality Assurance Cell |
| गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ | Ganeshkhind, Pune – 411007 |
| दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१०४५/८/९/५१ | Contact No. 020-25621044/8/9/51 |
| ई-मेल - iqac@unipune.ac.in | E-mail - iqac@unipune.ac.in |
| संकेतस्थळ - www.unipune.ac.in | Website – www.unipune.ac.in |


**अंगुहक/ २०२६/६६८** **दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२६**

## परिपत्रक
## अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

**प्रति,**

**मा. संचालक / विभागप्रमुख / शाखाप्रमुख,**
सर्व विद्यापीठ विभाग व प्रशासकीय विभाग
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय :** ***Google for Education* यांच्या सहकार्याने** शुक्रवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२६ **रोजी आयोजित** "Artificial Intelligence (AI) Training Programme" **साठी विद्यापीठ विभाग व प्रशासकीय विभागांकडून नामनिर्देशन मागविणेबाबत.**

**महोदय / महोदया,**

*Google for Education* यांच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **भूशास्त्र विभागाच्या सभागृहामध्ये शुक्रवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२६** रोजी **Artificial Intelligence (AI) Training Programme** आयोजित करण्यात आला आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence – AI) साधनांचा जबाबदारीने व प्रभावीपणे शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाजामध्ये उपयोग करण्यासाठी सक्षम करणे हा आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील :

**१. सकाळी ०९.३० ते दुपारी १२.३०**
विद्यापीठ विभागातील **जास्तीत जास्त ०३ शिक्षक (Faculty Members)**

**२. दुपारी ०२.३० ते सायंकाळी ०५.००**
विद्यापीठ विभागातील **जास्तीत जास्त ०२ प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी (Administrative Officer / Staff Member)**

त्या अनुषंगाने, प्रत्येक **विद्यापीठ विभाग व प्रशासकीय विभागाने** संबंधित शिक्षक तसेच प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे नामनिर्देशन **मंगळवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी** खालील Google Form द्वारे सादर करावे.

Google Form Link: **https://forms.gle/YryQaakQbJEhDJeT7**

Google Form भरताना संबंधित **संचालक / विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांच्या स्वाक्षरीसह विभागाच्या अधिकृत लेटरहेडवरील नामनिर्देशन पत्र (Nomination Letter) PDF स्वरूपात अपलोड करणे अनिवार्य आहे.**

सदर परिपत्रक **सर्व विद्यापीठ विभाग व प्रशासकीय विभागांसाठी** लागू असून, सर्व संबंधित विभागांनी विहित मुदतीत नामनिर्देशन सादर करावे, ही विनंती.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.



**प्रा. डॉ. विनायक जोशी**
संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे - ४११००७